25 वर्षे
विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर
(प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा. क्र. मनपा/सा.प्र./ २५ /२०२६-२७ दि.०८/०४/२०२६

## //परिपत्रक//

प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय परिपत्रकानुसार मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. **मा. महापौर श्रीम. डिंपल मेहता** यांच्या शुभहस्ते मा. आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) व मा. उपमहापौर श्री. ध्रुवकिशोर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मा. स्थायी समिती सभापती श्री. हसमुख गहलोत, मा. महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीम. अनिता पाटील, मा. महिला व बालकल्याण समिती उपसभापती श्रीम. हेमा बेलानी, मा. अध्यक्षा-रौप्य महोत्सवी वर्ष समिती श्रीम. शानु गोहिल, मा. अति. आयुक्त (सर्व), उपायुक्त (सर्व), शहर अभियंता, नगरसचिव, अधिकारी/कर्मचारी वर्ग व पत्रकार यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वा. घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास, एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस सकाळी ०९.३० वाजता पुष्पहार अर्पण करणे. तदनंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी ०९.४५ वा. छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस **मा. महापौर श्रीम. डिंपल मेहता** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे.

तरी सदर कार्यक्रमास सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

--------------------------

--------------------------

--------------------------